**ANSWER KEY FOR SAMPLE QUESTION PAPER 2019-20**

**मराठी (००९)**

**STD: 10** **MARATHI (009)**

## SECTION - A

| प्रश्न | उपप्रश्न | अपेक्षित उत्तर | गुणदान |
|---|---|---|---|
| प्र.१ | | **खालील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची योग्य उत्तरे लिहा.** | १० |
| प्र.१ | अ | **खालील प्रश्नांच्या उत्तराचा अचूक पर्याय निवडून लिहा. (कोणतेही ३)** | |
| | १ | 'उच्च' या शब्दाचा विरूध्दार्थी शब्द - नीच | १ |
| | २ | आपण टि.व्ही चे गुलाम बनून तो जे दाखवील ते बघत राहतो. | १ |
| | ३ | उन्हाची आग चहूकडे पेटलेली असताना बाभळी-कडूनिंबाच्या सावलीत थंडावा जाणवतो. | १ |
| | ४ | विशिष्ट काळात वापरली न गेलेली माहिती मेंदू पुसून टाकतो. | १ |
| प्र.१ | ब | **खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा. (कोणतेही ३)** | |
| | १ | कार्व्हर, जगदीशचंद्र बसू, डॉ.जेन गुडाल हे निसर्गाशी दोस्ती केलेले अभ्यासक आहेत. | १ |
| | २ | भाद्रपदात बकुल-प्राजक्ताच्या झाडाखालून जाताना सुवासाची मखमली पखरण जाणवते. | १ |
| | ३ | दूरदर्शन हे 'दृकश्राव्य' माध्यम आहे. | १ |
| | ४ | हरणाचा पाठलाग करतारा तिथला चपळ चित्ता पाहताना सतत कुबड काढून वा लोळत टी.व्ही बघणाऱ्या आपल्या कण्याची मात्र वाट लागते. | १ |
| प्र.१ | क | **खालील प्रश्नांची उत्तरे २ ते ३ वाक्यात लिहा.** | |
| | १ | मानवी मेंदू मिळालेल्या माहितीची प्रक्रिया करतो. तिचं वर्गीकरण करतो. योग्य त्या कप्प्यांत ती साठवतो. विशिष्ट काळात वापरली न गेलेली माहिती तो पुसूनही टाकतो. | २ |
| | २ | विश्वाची माहिती मिळवण्यासाठी माणसापाशी पाच ज्ञानेंद्रिये आहेत. कान, त्वचा, डोळे, जीभ आणि नाक. या इंद्रियांमार्फत मानवाला अनुक्रमे शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध यांची जाणीव होते. | २ |
| प्र.२ | | **खालील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची योग्य उत्तरे लिहा.** | १० |
| प्र.२ | अ | **खालील प्रश्नांच्या उत्तराचा अचूक पर्याय निवडून लिहा. (कोणतेही ३)** | |
| | १ | कोलंबिया २००३ यान अभिमानाने निळ्याशार अवकाशापलिकडे भ्रमण करू लागले. | १ |
| | २ | भारत सरकारतर्फे कर्नाळच्या दोन हुशार विद्यार्थ्यांना नासाची शैक्षणिक सफर घडविली जाते. | १ |
| | ३ | १९८२ साली एरोस्पेस इंजिनिअरिंगमधली मास्टर ऑफ सायन्स (एम. एस.) पदवी कल्पना चावलाला टेक्सास विद्यापीठाकडून मिळाली. | १ |
| | ४ | नासाच्या संशोधन विभागात काम करण्यासाठी कल्पनाची निवड करण्यात आली. ही नोकरी म्हणजे कल्पनाचा बहुमान होता. | १ |
| प्र.२ | ब | **खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा. (कोणतेही ३)** | |
| | १ | १ जुलै १९६१ साली कल्पना चावलाचा जन्म झाला. | १ |
| | २ | टागोर बालनिकेतनमध्ये कल्पनाचे शालेय शिक्षण झाले. | १ |
| | ३ | पूर्वनियोजनानुसार कोलंबिया अवकाशयानाचा परतीचा प्रवास १ फेब्रुवारी २००३ रोजी सुरू झाला. | १ |
| | ४ | कोलंबियाच्या अवकाश मोहिमेचे प्रशिक्षण शिस्तबद्ध, काटेकोर व खडतर होते. | १ |
| प्र.२ | क | **खालील प्रश्नांची उत्तरे २ ते ३ वाक्यात लिहा.** | |
| | १ | 'आता ओलसर तृणधान्यांना कोंब फुटले आहेत. कोळी सुंदर जाळी बांधत आहेत. कोशातून रेशीमकीडा बाहेर पडला. माशांना पिल्ले झाली आणि हे सजीव जीवनचक्र अवकाशातही चालू राहात आहे! या | २ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | संशोधनाचा पुढील अवकाशमोहिमेत फार मोठा उपयोग होत आहे.' - हा रिपोर्ट कल्पनाने नासाला पाठविला होता. | |
| | २ | १९८८ मध्ये कल्पना चावलाला पी. एच. डी. प्रदान करण्यात आली. अवकाशात जाणाऱ्या वस्तू, त्यावर होणाऱ्या प्रक्रिया, होणारे विविध परिणाम याबाबतीत तिने विशेष संशोधन केले. | २ |

## SECTION – B

| **प्रश्न** | **उप प्रश्न** | **अपेक्षित उत्तर** | **गुणदान** |
|---|---|---|---|
| **प्र.३** | | **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे निबंध लिहा.** | ८ |
| | | • **निबंधात खालील गोष्टीवर लक्ष द्यावे-** | |
| | | • विषयज्ञान, तर्कशक्ती व त्याची सलग मांडणी, उपयोजन कौशल्य. | |
| | | • मुद्देसूदपणा. | |
| | | • आकर्षक प्रारंभ. | |
| | | • म्हणी, वाक्प्रचार, काव्यपंक्ती यांचा योग्य वापर. | |
| | | • हस्ताक्षर व शुद्धलेखन. | |
| | | • विरामचिन्हांचा यथायोग्य वापर. | |
| | | • समर्पक शेवट. | |
| | | **-वरील सर्व घटकांचा सारासारपूर्वक विचार करून गुणदान करावे.** | |
| **प्रश्न** | **उप प्रश्न** | **अपेक्षित उत्तर** | **गुणदान** |
| **प्र.४** | **अ** | **खालील मुद्द्यांच्या आधारे गोष्ट लिहा व गोष्टीला शीर्षक देऊन तात्पर्य लिहा.** | ७ |
| | | • कथालेखनात खालील गोष्टीवर लक्ष द्यावे- | |
| | | • शीर्षक. | |
| | | • आकर्षक प्रारंभ, विषयाची योग्य मांडणी, मुद्देसूदपणा व कल्पकता. | |
| | | • प्रारंभ व शेवट आकर्षक, रंजकता. | |
| | | • भाषा सौंदर्य - म्हणी, वाक्प्रचार, यांचा योजकतेने वापर. | |
| | | • आकर्षक शैली व संवाद. | |
| | | • भाषा शुद्धता - विरामचिन्हांचा यथायोग्य वापर, शुद्ध लेखन | |
| | | • तात्पर्य | |
| | | • टीप : कथा नेहमी भूतकाळातच असावी. | |
| | | -वरील सर्व घटकांचा सारासारपूर्वक विचार करून गुणदान करावे. | |
| | | **किंवा** | |
| | | **खालील विषयावर बातमी लेखन करा.** | ७ |
| | | • समर्पक शीर्षक. | |
| | | • दिनांक, स्थळ, कालावधी, संबंधित व्यक्तींचा योग्य उल्लेख. | |
| | | • सोपी, सुटसुटीत वाक्यरचना. | |
| | | • अचूक व योग्य तपशील, तटस्थ भूमिकेतून लेखन. | |
| | | • विरामचिन्हांचा योग्य वापर. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | **<u>टीप-</u>** बातमीतील विषयानुसार लिखाणात काळाचा वापर करावा. उदा- घडून गेलेल्या घटनेविषयी बातमी असेल तर भूतकाळाचा वापर व भविष्यातील सूचनांसंबंधी बातमी असल्यास भविष्यकाळाचा वापर करावा. | |
| | **आ** | **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा.** | ५ |
| | | • पत्र लेखनासाठी आवश्यक बाबी- | |
| | | • दिनांक पत्राच्या वरच्या डाव्या कोपऱ्यात लिहावा. | |
| | | • मायना- ज्यांना पत्र पाठवायचे त्यांना डावीकडे संबोधित करावे. | |
| | | • विषय- मोजक्या शब्दात असावा. | |
| | | • मजकूर- मजकूर विषयाशी संबधित त्रोटक व नेमका असावा, समर्पक, मुद्देसूद रचना, पाल्हाळ नसावे, भाषा व्यावहारिक व भारदस्त असावी. | |
| | | • शेवट व स्वाक्षरी- पत्राचा शेवट करताना डावीकडील खालच्या कोपऱ्यात पत्र पाठवणाऱ्याची स्वाक्षरी व पत्ता. | |
| | | • <u>टीप</u> -लिफाफा आवश्यक. | |

## <u>SECTION – C</u>

| प्रश्न | उप प्रश्न | अपेक्षित उत्तर | गुणदान |
|---|---|---|---|
| **प्र.५** | **अ** | **सूचनेप्रमाणे लिहा. (कोणतेही ४)** | **४** |
| | १ | गेलो- क्रियापद | १ |
| | २ | विशेषण- अद्वितीय | १ |
| | ३ | दररोज- क्रियाविशेषण | १ |
| | ४ | शब्दयोगी अव्यय- आड | १ |
| | ५ | <u>म्हणून</u> - उभयान्वयी अव्यय | १ |
| | ६ | <u>अबब!/बाप</u> रे! किती उंच मनोरा हा! (आश्चर्यजनक केवलप्रयोगी अव्यय असावे.) | १ |
| | **आ** | **सूचनेनुसार बदल करा. (कोणतेही ३)** | **३** |
| | १ | नीला निबंध लिहील./नीला निबंध लिहिणार आहे. | **१** |
| | २ | वर्तमानकाळ | **१** |
| | ३ | भविष्यकाळ | **१** |
| | ४ | मुले क्रिडांगणावर खेळत होती. / मुले क्रिडांगणावर खेळली. | **१** |
| | ५ | वर्तमानकाळ | **१** |
| | **इ** | **पुढील वाक्ये कंसातील सूचनेनुसार लिहा. (कोणतेही ३)** | **३** |
| | १ | राघव शाळेत अनुपस्थित होता. - विधानार्थी होकारात्मक वाक्य | **१** |
| | २ | अरे वा! केवढी छान गातेस तू! / किती छान गातेस तू! / तू किती छान गातेस! - उद्गारवाचक वाक्य | **१** |
| | ३ | अपमान केल्यास कोणाला राग येणार नाही? / अपमान केल्यास प्रत्येकालाच राग येईल ना? - प्रश्नार्थक वाक्य | **१** |
| | ४ | त्याचे अक्षर फारच वाईट आहे. / त्याचे अक्षर फारच खराब आहे. - विधानार्थी वाक्य | **१** |
| | ५ | प्रवासात भरभरून बोला / बोल. - आज्ञार्थी वाक्य | **१** |
| | **ई** | **सूचनेप्रमाणे लिहा. (कोणतेही २)** | **२** |
| | १ | मी शाळेतून आत्ताच आलो. - कर्तरी प्रयोग | **१** |

| | | | |
|---|---|---|---|
| | २ | तिने आता घरी जावे. - भावे प्रयोग | **१** |
| | ३ | मांजराकडून उंदीर मारला गेला. - कर्मणी प्रयोग | **१** |
| | ४ | पावसात मोर आनंदाने नर्तन करतो. - कर्तरी प्रयोग | **१** |
| | उ | **लिंग बदला. (कोणतेही २)** | **२** |
| | १ | कवी - कवयित्री | १ |
| | २ | दासी - दास | १ |
| | ३ | स्त्री - पुरूष | १ |
| | ४ | वधू - वर | १ |
| | **ऊ** | **वचन बदला. (कोणतेही २)** | **२** |
| | १ | भाषा - भाषा | १ |
| | २ | वाट - वाटा | १ |
| | ३ | वाघ - वाघ | १ |
| | ४ | पुस्तक - पुस्तके | १ |
| | **ए** | **समानार्थी शब्द लिहा. (कोणतेही २)** | २ |
| | १ | घर - गृह / सदन | १ |
| | २ | अभिवादन - नमस्कार / वंदन / नमन | १ |
| | ३ | धेनू - गोमाता / गाय | १ |
| | ४ | चेहरा - मुख / मुद्रा | १ |

| **<u>प्रश्न</u>** | **<u>उप प्रश्न</u>** | **<u>अपेक्षित उत्तर</u>** | **<u>गुणदान</u>** |
|---|---|---|---|
| | **ऐ** | **विरुध्दार्थी शब्द लिहा. (कोणतेही २)** | **२** |
| | १ | हजर - गैरहजर | १ |
| | २ | शाश्वत - अशाश्वत | १ |
| | ३ | निंदा - स्तुती / कौतुक | १ |
| | ४ | बेसावध - सावध | १ |

## <u>SECTION - D</u>

| **<u>प्रश्न</u>** | **<u>उप प्रश्न</u>** | **<u>अपेक्षित उत्तर</u>** | **<u>गुणदान</u>** |
|---|---|---|---|
| **प्र.६** | **अ** | **योग्य पर्याय शोधून वाक्य पूर्ण लिहा. (कोणतेही तीन)** | **३** |
| | १ | कडक थंडीच्या दिवसात एक म्हातारा, अशक्त <u>भिक्षेकरी</u> कट्ट्याला लागून चिरगुटे टाकून कुडकुडत बसल्याचे मी पाहिले. | **१** |
| | २ | पहिल्या दिवशी निम्म्याहून अधिक कचेरीला माझ्या वजन घटवण्याच्या व्रताची <u>वार्ता</u> गेली होती. | **१** |
| | ३ | “आकर्षक <u>सुरूवात</u> आणि परिणामकारक शेवट ही माझी वैशिष्ट्ये.” | **१** |
| | ४ | भीषण अपघात टाळल्याचे <u>श्रेय</u> निरंजनला देण्यात आलं होतं. | **१** |
| | ५ | साऱ्या तपोवनातील तो एक आनंदाचा आणि <u>चैतन्याचा</u> दिवस. | **१** |
| | **आ** | **खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा. (कोणतेही तीन)** | **३** |
| | १ | नारायण सुर्वे हे मुळातच शालीन / नम्र असल्यामुळे त्यांची शालीनता हरवली नाही. | **१** |
| | २ | पंतांच्या स्वयंपाक घरातून कोबी, कॉलिफ्लॉवर या बाळसेदार भाज्यांची हकालपट्टी झाली. | **१** |
| | ३ | तपोवनातील स्त्रिया वर्षातून दोनदा संक्रांतीला आणि ज्येष्ठ पौर्णिमेला चुडीवाल्याची आतुरतेने वाट पाहत. | **१** |

| | | | |
|---|---|---|---|
| | ४ | रेखामावशींची पावले अधिक सुंदर आहेत कारण त्यांच्या रोजच्या जगण्यात कार्बन उत्सर्जनाला वाव नाही. | **१** |
| | ५ | मराठी दिन २७ फेब्रुवारीला साजरा करतात. | **१** |
| | ६ | भावे सरांनी भिंगाच्या मदतीने सूर्यकिरणांची शक्ती कागदावर एकत्र केल्यास कागद जळतो, हा प्रयोग करून दाखविला. | **१** |
| **प्र.७** | | **३० ते ४० शब्दांत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** | **४** |
| | १ | (पाठ- लेखक) - सुर्वे यांना अनेक कार्यक्रमांना सन्मानाची शाल मिळत राहत- त्यांचे उद्‌गार "शाली घेऊन घेऊन मी आता 'शालीन' बनलो आहे"- शालींनी- सन्मानाने माणूस अहंकारी बनतो हे खरे वास्तव- 'शालीमुळे शालीनता येत नाही तर जाते' हे सत्य- म्हणूनच नारायण सुर्व्यांच्या वाक्यात उपरोधिक खोच होती. | २ |
| | २ | (पाठ- लेखक) - आचार्य बर्वे यांनी पंतांना - जिभेवर ताबा ठेवणे - मनाचा संयम बाळगणे - मनाची एकाग्रता करण्याची तयारी करावी - कमीत कमी बोलणे - मौनाचे महत्त्व लक्षात घेणे असे सल्ले दिले. | २ |
| | ३ | (पाठ- लेखक) -निरंजन मेहनती व अभ्यासू मुलगा- अनाथ - चांगल्या स्वभावामुळे गुरूजींचा लाडका- गुरूजींबद्‌दल त्याला असलेला आदर - नागरिकशास्त्राच्या पेपरच्या दिवशी त्याला रेल्वेरूळावर घातपाताच्या खुणा दिसल्या - परीक्षा न देता एका नागरिकाचे कर्तव्य पार पाडले- स्टेशन मास्तरांना माहिती दिली- मोठा अपघात टळला- म्हणून तो खरा जबाबदार नागरिक. | २ |
| | ४ | (पाठ- लेखक) -वेगळ्या प्रसिध्द लेखकांनी लिहिलेले वेगवेगळे साहित्य प्रकार- त्यांचे अनुभव कथन - त्यांची शैली -प्रत्येक प्रकारातील सखोल वाचनाने शब्दसंपत्तीत वाढ होते- आपली आवड समजून चिंतन, मनन करणे आवश्यक- प्रत्येक पुस्तकाची निर्मिती प्रक्रिया जाणून घेणे- या वाचनामुळे लेखनाची बिजे रुजतात- लेखन विकासित होते. | २ |
| | ५ | (पाठ- लेखक) - सततच्या वायू प्रदूषणामुळे वातावरण दूषित - कार्बनच्या हवेतील वाढत्या प्रमाणामुळे वातावरण सतत तापते- पर्यावरण वाचवले पाहिजे- वृक्ष संवर्धन केले पाहिजे- इंधनावर चालणाऱ्या वाहनांऐवजी हवेवर चालणारी 'सायकल' वापरली पाहिजे- प्रदूषण करणाऱ्याला सावध केले पाहिजे- म्हणजे धरतीचा ताप उतरेल. | २ |
| | | **टीप** - पाठ व लेखक यांचा उल्लेख आवश्यक - ½ गुण, उर्वरित उत्तर - 1½ गुण. | |
| **प्रश्न** | **उपप्रश्न** | **अपेक्षित उत्तर** | **गुणदान** |
| **प्र.८** | **अ** | **योग्य पर्याय निवडून वाक्ये परत लिहा. (कोणतेही दोन)** | २ |
| | **१** | वणवा लागत असे वनी। पाडस चिंतीत हरणी। | १ |
| | **२** | झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले. | १ |
| | **३** | जीव ओवाळावा तरी जीव किती हा लहान; तुझ्या शौर्यगाथेपुढे त्याची केवढीशी शान. | १ |
| | **४** | हजार आम्ही एकी बळकट, सर्वांचे हो एकच मनगट. | १ |
| | **आ** | **खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही चार)** | ४ |
| | १ | चातक मेघाला विनवित असतो. | १ |
| | २ | नारायण सुर्वे यांच्या मते भाकरीचा चंद्र शोधण्यात जिंदगी बरबाद झाली. | १ |
| | ३ | रणांगणात आजुबाजूला गोळीबार, तोफा धडाडत असतानाही धाडसाने लढत राहणाऱ्या सैनिकाचे पाऊल जिद्‌दीचे वाटते. | १ |
| | ४ | श्रावण फुलामुलांतून हसतो असे कवीला वाटते. | १ |
| | ५ | यंत्र श्रमशक्तीचे मंत्र बोलतात. | १ |
| | ६ | जेव्हा मुठीमध्ये द्रव्य व शिरेमध्ये रक्त नसते, तेव्हा कष्टाचे सामर्थ्य अपुरे वाटते. | १ |
| **प्र.९** | | **खालीलपैकी कोणत्याही एका काव्यपंक्तीचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.** | २ |
| | १ | संत नामदेव-'अंकिला मी दास तुझा' - श्री विठ्ठलाला आई मानून स्वतःचा सांभाळ करण्याची विनंती- त्यासाठी विविध उदाहरणे (दृष्टांत)- जसे पिल्लू जमिनीवर पडते आहे हे पाहून पक्षिणी झेपावते तसे देवाने | २ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आपले संकटातून रक्षण करावे. | |
| | २ | कवी- कविता- कवितेतून शेतकरी, कष्टकरी, श्रमांचे, एकात्मतेचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न, कष्ट करणाऱ्या प्रत्येक भारतीयाचा मातीवर हक्क आहे- नव्या पिढीने नव्या युगाचे स्वप्न साकार करणे हे कर्तव्य मानून श्रम करावेत. | २ |
| | ३ | कवी नारायण सुर्वे-कविता- दोन दिवस-गरीब कामगारांचे संघर्षमय आयुष्य-पोटापाण्याची तरतूद करण्यात पूर्ण आयुष्य संपल्याची जाणीव आणि भविष्यात आता किती उन्हाळे डोक्यावर आहेत याचा विचार- कामगारांच्या जीवनातील भयाणता. | २ |
| | | **टीप** - कवी व कविता यांचा उल्लेख आवश्यक - ½ गुण, उर्वरित उत्तर - 1½ गुण. | |
| **प्र.१०** | | **योग्य पर्याय निवडून वाक्ये परत लिहा.** | २ |
| | १ | होमी भाभा यांचे नाव ‘बार्क’ या संस्थेला दिले आहे कारण त्यांनी <u>भारतातील अणुसंशोधनाचा पाया घातला.</u> | १ |
| | २ | इनाम - बक्षीस | १ |
| | **किंवा** | | |
| | १ | अत्तर- इत्र या अरबी शब्दावरून आला आहे. | १ |
| | २ | ‘आपण काय काम करायचं ते आपणच ठरवायचं, बॉसने सांगितलं तेवढच काम करायचं, सांगितलं नसेल तर कामच नाही असं समजायच हे चूक आहे’ हा भाभांचा मुद्दा लेखकाच्या मनावर कोरला गेला. | १ |